# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०५/०३/२०२५ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५४** — **विषय क्रमांक - ८५४**

**दिनांक - ०५/०३/२०२५** — **खाते – मा.आयुक्त**

ठराव क्र. ८५४
दिनांक - ०५/०३/२०२५

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/श.अ/तां/२६/७/२०२५ दि.०५/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९३८ दि.११/०२/२०२५ अन्वये, पिं.चिं.मनपाचे इ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाचे सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात वाढ/घट करणेस मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. ८५४
दिनांक - ०५/०३/२०२५

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/श.अ/तां/२६/७/२०२५ दि.०५/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९३८ दि.११/०२/२०२५ अन्वये,पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्व्हेक्षण व मेंटेनन्स रिपोर्टिंग GIS प्रणालीवर करणेचे काम सुरू आहे. सदर कामाच्या नावाचा सन 2024-25 चे अंदाजपत्रकात समावेश नाही. तरी सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील ' विशेष योजना- या लेखाशिर्षावर "पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्वेक्षण व मेंटेनन्स रिपोर्टिंग GIS प्रणालीवर करणे" या नावाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामासाठी तरतूद उपलब्ध करणेसाठी खालीलप्रमाणे वाढ / घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रू. | सन २०२४-२५ चे | लेखा शिर्ष | | बजेट कोड | सन 2024-25 ची मूळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन 2024-25 साठी एकूण मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पा. क्र. | अ. क्र. | | | | | | |
| १ | प्रभाग क्र. ५ गवळीनगर मधील दिघी रोड ते गोकुळ स्वीट मार्ट पर्यंतचा रस्ता अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे. | **150000000** | 26 | 1 | विशेष योजना | 242501088 | **45000000** | - | **5000000** | **40000000** |
| २ | पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्व्हेक्षण व मेंटेनन्स रिपोर्टिंग GIS प्रणालीवर करणे | **80000000** | नवीन | विशेष योजना | | - | - | **5000000** | - | **5000000** |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५५** **विषय क्रमांक - ८५५**

**दिनांक - ०५/०३/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५५ दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.सविवि/०५/कावि/३०/२०२५ दि.१०/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९५९ दि.११/०२/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन (LCF) यांच्यातील लाईटहाउस प्रकल्पाचा करारनामा नूतनीकरण (MOA renewal) करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८५५ दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.सविवि/०५/कावि/३०/२०२५ दि.१०/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४९५९ दि.११/०२/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाजविकास विभाग (नागरवस्ती विकास योजना) आणि मे.लाईट हाऊस कम्युनिटीज (मे.पुणे सिटी कनेक्ट डेव्हलपमेंट फांऊडेशन) यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीमध्ये जागांच्या उपलब्धतेनुसार मनपा हद्दीतील १८ ते ३० वयोगटाच्या युवक युवतीसाठी लाईट हाउस कौशल्य विकास आणि रोजगार निर्मीतीचा प्रकल्प ५ वर्षे कालावधीकरीता राबविणेस मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१५ दिनांक २६/१२/१९ व मा.स्थायी समिता सभा ठराव क्र.६२९५ दिनांक ०८/०१/२०२० अन्वये मान्यता दिली असून सदरचे कामकाजाबाबत दि.१५/०९/२०२० रोजी सामंजस्य करार केला आहे.<br><br>याबाबत करारनाम्याचे अनुषंगाने मे.लाईट हाऊस कम्युनिटी फाउडेशन यांना महानगरपालिके मार्फत मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मे.लाईट हाऊस कम्युनिटीज यांनी दि.२७/१२/२०२४ व दि.१६/१/२०२५ च्या पत्रान्वये कौशल्यम विकास व रोजगार निर्मीतीच्या प्रकल्पाची मुदत दिनांक १४ सप्टेंबर २०२५ मध्ये संपुष्टात येत असल्याने सदरच्या प्रकल्पाचा करारनामा नूतनीकरण करण्यास विनंती केली आहे.<br><br>सद्यस्थितीत सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेनुसार पि.चिं.मनपा कार्यक्षेत्रात १२ लाईट हाऊस केंद्र कार्यरत आहेत. तसेच मार्च २०२१ ते डिसेंबर २०२४ पर्यंत २९१७ युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणेत आल्या आहेत. मे.लाईट हाउस कम्युनिटी फाउंडेशन यांचे बरोबर केलेल्या सामंजस्य कराराचा कालावधी दि.१४/०९/२०२५ रोजी संपुष्टात येणार असून त्यांचे बरोबर दिनांक १५/०९/२०२५ पुढील ५ वर्ष कालावधीसाठी नव्याने सामंजस्य करार करणे व सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद १२ लाईट हाउस केंद्र चालू ठेऊन आवश्यकतेनुसार नविन लाईट हाऊस केंद्र सुरु करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५६ विषय क्रमांक - ८५६

दिनांक - ०५/०३/२०२५ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५६<br>दिनांक -<br>०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. जलनि:सारण/२६/२०२५ दि.१७/०२/२०२५ अन्वये, मनपाचे ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८५६<br><br>दिनांक -<br>०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. जलनि:सारण/२६/२०२५ दि.१७/०२/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रांतर्गत ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे या कामाचा महापालिका अंदाजपत्रक सन २०२३-२४ अंतर्गत जलनि:सारण विभागा अंतर्गत पान क्र. ४६७ व अ.क्र ३ अन्वये, समावेश आहे.<br><br>सदर कामाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रकात समावेश करून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या त्यात पात्र ठेकेदार मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स यांनी सादर केलेल्या दरास मान्यता मिळालेली आहे तथापि जागा प्रत्यक्षात ताब्यात नसलेने कामाचे आदेश देणेत आलेले नाहीत. सद्यस्थितीत विषयांकित नियोजित कामा करिता लागणारी पशुसंवर्धन विभागाची जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याकारणामुळे विषयांकित कामाला विलंब होत आहे.<br><br>चिखली येथे इंद्रायणी नदी काठची स्मशानभुमी लगत पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या ताब्यात असलेली सर्व्हे नं-१६३६ आरक्षण क्र.१/९८ ची दफनभुमी करीता आरक्षित असलेली एकूण १.७५ हेक्टर जमिनी पैकी ४०% प्रमाणे ०.७० हेक्टर जमीनीवर मैलाशुद्धीकरण केंद्र बांधल्यास इंद्रायणी नदीचा प्रदूषणाचा मोठा प्रश्न सुटणार आहे. तसेच UDCPR 2020 4.2 USESPERMISSIBLE IN DEVELOPMENT PLAN RESERVATIONS, PAGE NO. 83 अन्वये, आरक्षित जागेत ४०% च्या मर्यादेत Public Necessity Work करणेस मुभा असुन त्यानुसार तेथे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे शक्य आहे.<br><br>इंद्रायणी नदी पात्रात मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणेची आवश्यकता पाहता विषयांकित "ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे" या कामाची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या चिखली स्मशानभूमी व लगत असलेल्या सर्व्हे नं-१६३६ वरील जागेत स्थलांतर करणेकामीच्या सदरच्या विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५७** **विषय क्रमांक - ८५७**

**दिनांक - ०५/०३/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५७ दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.क्षेत्रिय अधिकारी, यांचेकडील पत्र क्र. गक्षेका/आ/०४/कावि/९०/२०२५ दि.१७/०२/२०२५, अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८५७<br><br>दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.क्षेत्रिय अधिकारी, यांचेकडील पत्र क्र. गक्षेका/आ/०४/कावि/९०/२०२५ दि.१७/०२/२०२५, अन्वये, स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा. आयुक्त साहेब यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक -१६/१०/२०२३ चे आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा. आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचलय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्जनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैंकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करुन सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे. त्यानुसार “ग” क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करणेत आला असून ती पुढीलप्रमाणे आहेत. |

| प्रभाग क्र. | नाव | सिट्स संख्या | निष्कासित करण्याचे कारण | जागेचा वापर |
|---|---|---|---|---|
| २१ | एच.बी. मोबाईल मार्केटमागे पिंपरी | २ | वापर होत नाही. | आरोग्य कार्यालय बांधण्यासाठी |
| २१ | वैष्णवदेवी मंदिरामागे | ४ | वापर होत नाही. | आरोग्य गोडाऊन बांधण्यासाठी |
| २१ | गणेशनगर झोपडपट्टी | ८ | SRAइमारत झाल्याने | रस्ता रुंदी करण्यामध्ये |
| २१ | पवनेश्वर मंदिरासमोर (मुतारी) | २ | जुनी आहे तसेच मोठया प्रमाणात नादुरुस्त आहे. | नवीन मुतारी बांधणे आवश्यक आहे. |
| २३ | चांदणी चौक, थेरगांव | ४ | १०० मीटर अंतरावर दुसरे शौचालय असल्याने वापर होत नाही. | सुशोभिकरणासाठी |
| २७ | तापकीरनगर | ७ | रेडिमेड सिफोरेटचे शौचालय असल्याने नादुरुस्त अवस्थेत आहे. | IHHL चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असलेने ७ सिट्स पैकी ३ सिट्स पाडणे व ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सिट्स (२महिला,२पुरुष) नवीन बांधणे |
| २७ | पवनानगर, महादेव मंदिरामागे | २६ | १६ सिट्स जादा असलेने निष्कासित करणे | १० सिट्स चा वापर मधे भिंत बांधुन स्त्री/पुरुषांकरिता शौचालयासाठी तसेच निष्कासित करावयाच्या १६ सिट्स च्या जागी साहित्यासाठी कोठी करणे आवश्यक |
| २७ | रहाटणी फाटा (मुतारी) | ३ | जुनी आहे व मोठ्या प्रमाणात नादुरुस्त असलेने निष्कासित करणे आवश्यक. | त्याच जागेवर स्त्री/पुरुषांसाठी जादा क्षमतेने बांधकाम करणे. |

उक्त प्रमाणे ग क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित करावयाची असून मा. सहा. आयुक्त आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र. स्वमअक/३/कावि/१४२/२०२४,दि.१९/१२/२०२४ अन्वये कळविलेनुसार महापालिकेच्या जागेवरील CT/PT/Urinals निष्कासित करणेकामी तसेच त्या जागेचा कोणत्या कारणासाठी वापर करणार आहे सदरच्या विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५८** **विषय क्रमांक - ८५८**

**दिनांक -** ०५/०३/२०२५ **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८५८<br>दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/३अ/कावि/ ६९/२०२५ दि.०५/०३/२०२५ अन्वये, मनपाचे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील उमेदवारांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत. |
| ठराव क्र. ८५८<br>दिनांक - ०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/३अ/कावि/ ६९/२०२५ दि.०५/०३/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट ब व गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात क्र.१८४/२०२२ ही प्रसिध्द करुन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सेवाप्रवेश नियमांना दि.१८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली आहे. सदर शासन मान्य सेवाप्रवेश नियमातील वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची अर्हता पुढीलप्रमाणे होती.<br>१) शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार.<br>२) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक.<br>उपरोक्त अर्हतेनुसार कन्स्ट्रक्शन सुपरवायझर, मेसन, आर्किटेक्चर ड्रॉफ्टसमन, सिव्हिल ड्रॉफ्टसमन (आरेखक स्थापत्य), बिल्डींग मेन्टेंनन्स तसेच शासनमान्य संस्थेकडील |

पाठ्यक्रमाची अर्हता असणा-या तसेच डी.सी.ई. किंवा बी.ई.(सिव्हिल) ही उच्च शैक्षणिक अर्हता असणारे उमेदवार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर उमेदवार रुजू झालेले आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगाचे अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी व भत्ते लागू करण्यात आलेले आहेत. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या सुधारित वेतनश्रेणीबाबत ६व्या व ७व्या वेतन आयोगानुसार तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| **६ व्या वेतन आयोगानुसार शासन मान्यतेप्रमाणे** | | **७ व्या वेतन आयोगानुसार शासनाकडील समकक्ष** | | |
|---|---|---|---|---|
| विद्यमान वेतनश्रेणी | ग्रेड वेतन | पे लेवल | वेतनश्रेणी | वेतन निश्चिती व वेतनवाढीसाठी ग्राह्य धरण्याचा ग्रेड पे |
| ५२००-२०२०० | २४०० | **एस ६** | १९९००-६३२०० | १९०० |
| ५२००-२०२०० | २८०० | **एस ८** | २५५००-८११०० | २४०० |

सन २०१५ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सरळसेवेने भरण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाकरीता ६ व्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८०० या प्रमाणे वेतनश्रेणी होती. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लाड वारस शिफारस किंवा अनुकंपा तत्वावर रुजू होणा-या कर्मचा-यासही ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस ८- २५५००-८११०० याप्रमाणे आहे.

जाहिरात क्र.१८४/२०२२ अन्वये भरण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची ७ व्या वेतन आयोगानुसार एस ६ – १९९००-६३२०० ग्रेड पे १९०० ही वेतनश्रेणी असल्याने सन २०१५ व सद्यस्थितीत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एकाच पदावर रुजू होणा-या कर्मचा-यांची वेगवेगळी वेतनश्रेणी होत असल्याने तफावत निर्माण होत आहे. प्रशासकीय कामकाजाचे सोईच्या दृष्टीने सदर तफावत दूर करणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रकरणी जाहिरात क्र.१८४/२०२२ अन्वये भरण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील उमेदवारांची वेतनश्रेणी एस ६ – १९९००-६३२०० ग्रेड पे १९०० या ऐवजी एस ८- २५५००-८११०० ग्रेड पे २४०० या प्रमाणे वेतनश्रेणी करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय** – **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८५९** — **विषय क्रमांक - ८५९**

**दिनांक -** ०५/०३/२०२५ — **खाते – मा.आयुक्त**

ठराव क्र. ८५९ दिनांक - ०५/०३/२०२५

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/१५९/२०२५, दि.०५/०३/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना वैद्यकीय सुविधा

पुरविणेकामी “धन्वंतरी गोल्ड योजना” लागू करणेस मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. ८५९

दिनांक - ०५/०३/२०२५

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/१५९/२०२५ दि.०५/०३/ २०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना सद्यस्थितीत कार्यान्वित असलेला वैद्यकीय विमा दि.११/०३/२०२५ रोजी रात्रौ १२.०० वा. संपुष्टात येत असलेने वैद्यकीय सुविधा पुरविणे करिता निर्णय घेणेकामी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि. १६.०१.२०२५, दि. २२.०१.२०२५ व दि.०५/०२/२०२५ रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. त्यामध्ये जुनी धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये बदल करून नव्याने **“धन्वंतरी गोल्ड योजना”** कार्यान्वित करणेकामी निर्णय झाला. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले,

१) धन्वंतरी स्वास्थ्य योजनेस यापुढे **“धन्वंतरी गोल्ड योजना”** असे संबोधित करावे. धन्वंतरी गोल्ड योजना समितीचे सदस्य खालील प्रमाणे असतील

| | |
|---|---|
| आयुक्त | अध्यक्ष |
| अध्यक्ष, पिंचिंमनपा कर्मचारी महासंघ मान्यताप्राप्त | उपाध्यक्ष |
| अति.<br>आयुक्त | उपाध्यक्ष |
| आरोग्य वैद्यकीय<br>अधिकारी | कार्याध्यक्ष |
| मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) | खजिनदार |
| सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य सचिव |
| अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| अधिष्ठाता | सदस्य |
| मुख्य लेखापरिक्षक | सदस्य |
| कायदा सल्लागार | सदस्य |
| उपायुक्त सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| मुख्य कामगार कल्याण अधिकारी | सदस्य |
| ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी (महिला) | सदस्य |
| मान्यताप्राप्त कर्मचारी महासंघाचे दोन प्रतिनिधी | सदस्य |

सदर समितीला धन्वंतरी गोल्ड योजनेमध्ये वेळोवेळी येणाऱ्या अडचणींनुसार व आवश्यकतेनुसार बदल करण्याचे संपूर्ण अधिकार असतील.

२) पिंपरी चिंचवड शहर, पुणे शहर व इतर भागातील ५० रुग्णालयांचे पॅनल तयार करुन रुग्णांलयांची A , B व C Category प्रमाणे वर्गवारी करणेत यावी.

३) ५० बेडसंख्या वरील रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्याची वर्गवारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्गवारी | बेड संख्या |
|---|---|---|
| 1 | A | 200 चे वर |
| 2 | B | 100 ते 199 |
| 3 | C | 50 ते 99 |

४) सिंगल स्पेशालिटी असणारी दहा रुग्णालये बेड संख्येचा विचार न करता अंगीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

५) धन्वंतरी गोल्ड योजनेअंतर्गत ५०+१०=६० रुग्णालयाचे पॅनल तयार करणेत येणार असून, तदनंतर एखादे नवीन रुग्णालय यादीत समाविष्ट करावयाचे असल्यास धन्वंतरी गोल्ड समितीची मान्यता घेऊनच समाविष्ट करावे.

६) नव्याने लागू करणेत येत असलेले धन्वंतरी गोल्ड योजनेचे दरपत्रके तयार करणेकामी वैद्यकीय विभागामार्फत समिती नेमून पुणे मनपा चे दर, CGHS चे दर,GIPSA चे दर व पिं.चिं. मनपाच्या जुन्या धन्वंतरी योजनेचे दर यांचा अभ्यास करून नव्याने दर निश्चित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर समितीने रुग्णालयाच्या वर्गवारीनुसार दरपत्रक तयार केले असून मान्यतेकामी सोबत जोडलेले आहे.

७) धन्वंतरी गोल्ड योजनेमध्ये कर्मचाऱ्यांच्या हिस्श्यापोटी खालीलप्रमाणे रक्कम घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

| संवर्ग | मनपा स्थायी आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडील प्रति महिना सभासद वर्गणी |
|---|---|
| वर्ग-१ आणि वर्ग-२ | र.रु.१,५००/- |
| वर्ग-३ | र.रु.१,१००/- |
| वर्ग-४ | र.रु.७००/- |

८) अंशदान पेन्शन योजना लागू असणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/ अधिकारी यांनी प्रत्येक वर्षीच्या १५ मार्च ते ३१ मार्च दरम्यान संवर्गनिहाय एकरकमी स्वतःचा हिस्सा मनपा कोषागारात जमा करावा व रक्कम जमा केल्याची पावती धन्वंतरी विभागास सादर करावी अन्यथा धन्वंतरी गोल्ड योजनेचा लाभ मिळणार नाही.

९) अधिकारी/कर्मचाऱ्याकडून प्राप्त रक्कमेच्या व्यतिरिक्त सदर योजनेकरिता प्रत्यक्ष होणारा खर्च मनपा फंडा मार्फत करण्यात येईल.

१०)अधिकारी/कर्मचाऱ्यांना खाजगी रुग्णालयामध्ये संवर्गानुसार खालीलप्रमाणे रुग्णालयात सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील असा निर्णय झाला.

| संवर्ग | रुग्णालयातील उपलब्ध सुविधा |
|---|---|
| वर्ग-१ आणि वर्ग-२ | प्रायव्हेट रूम |
| वर्ग-३ | सेमी प्रायव्हेट रूम |
| वर्ग-४ | जनरल वार्ड |

११) एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास संवार्गानुसार उपलब्ध करून दिलेल्या (जनरल/प्रायव्हेट/सेमी प्रायव्हेट) रूममध्ये बदल करावयाचा असल्यास सभासद वर्गणी संबंधित संवर्गाप्रमाणे देय राहील. सदर कर्मचार्यांनी याबाबत सभासद नोंदणी करतानाच लेखी हमीपत्र धन्वंतरी विभागास सादर करावे. यामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१२) खाजगी रुग्णालयांच्या A,B आणि C वर्गवारी नुसार त्यांची बिले खालील प्रमाणे अदायगी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये अधिकारी/ कर्मचाऱ्याने रुग्णालयातून डिस्चार्ज घेतेवेळेस भरावयाची रक्कम व मनपा मार्फत अदा करावयाची रक्कम खालील प्रमाणे असेल.

| **रुग्णालयाचा वर्ग** | **मनपामार्फत रुग्णालयास अदा करावयाची रक्कम (बिले तपासणी केलेनंतर)** | **अधिकारी/कर्मचाऱ्याने बिलापोटी रुग्णालयातून डिस्चार्ज घेतेवेळेस भरावयाची रक्कम** |
|---|---|---|
| A | ९०% | १०% |
| B | ९५% | ५% |
| C | १००% | ०% |

१३) अधिकारी/कर्मचारी यांना OPD बेसिस वरील खर्चाची रक्कम मनपा मार्फत अदा करण्यात येणार नाही (तथापि MRI व CTScan सुविधा मनपा रूग्णालयामध्ये PPP तत्वावर सुरु असणाऱ्या सेंटर मध्ये मोफत उपलब्ध करून देण्यात याव्यात).

१४) PETScan व शासनमान्य दुर्धर आजारांवरील रुग्णांकरिता OPD बेसिस वरील तपासण्या व औषधोपचारावरील खर्च तज्ञ समितीमार्फत तपासणी करून धन्वंतरी गोल्ड समितीच्या मान्यतेने धन्वंतरी गोल्ड योजना धोरणानुसार अदा करण्यात यावा.

१५) धन्वंतरी गोल्ड योजनेच्या धोरणामध्ये व दरपत्रकामध्ये नमूद नसलेल्या प्रयोगशाळा तपासण्या व इतर प्रोसिजरची (मेडिकल आणि सर्जिकल) बिले अदा करण्यापूर्वी संबंधीत विषय तज्ञांचा अभिप्राय घेऊन संबंधित खाजगी रुग्णालयास त्याप्रमाणे बिले सादर करणेकामी कळविणेत यावे.

१६) खाजगी रुग्णालयाकडून वेळोवेळी सादर होणाऱ्या व धोरणामध्ये नमूद नसलेल्या बाबी बाबत संबंधित तज्ञांचा अभिप्राय घेऊन धन्वंतरी गोल्ड समितीची मान्यता घेऊन निर्णय घेण्यात यावेत.

१७) खाजगी रुग्णालयाने वैद्यकीय उपचारांचे बील अदायगीकामी सादर केल्यानंतर कामकाजाचे 7 ते 10 दिवसांमध्ये एकुण बील रकमेच्या 70% रक्कम रुग्णालयास अदा करावी असा निर्णय घेण्यात आला. याबाबत वैद्यकीय विभाग व लेखा विभाग यांनी समन्वयाने सदर बिले वेळेत अदा होतील याची दक्षता घ्यावी.

१८) उर्वरीत 30% किंवा प्रत्यक्ष मंजूर बीलाची उर्वरीत रक्कम तांत्रिक तपासणी पूर्ण करून बिल सादर झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यात (६० दिवस) अदा करावीत. याबाबत वैद्यकीय विभाग व लेखा विभाग यांनी समन्वयाने सदर बिले वेळेत अदा होतील याची दक्षता घ्यावी.

१९) अधिकारी/ कर्मचारी पॅनलबाहेरील रुग्णालयात दाखल झाल्यास धन्वंतरी गोल्ड योजनेच्या वर्गवारी प्रमाणे बिल अदा करण्यात येईल. तसेच अधिकारी/ कर्मचारी पॅनलबाहेरील ५० पेक्षा कमी बेड संख्या असलेल्या रुग्णालयात दाखल झाल्यास Category C प्रमाणे बिले अदा करण्यात यावीत.

२०) धन्वंतरी गोल्ड योजना १० वर्षाकरिता कार्यान्वित करण्यात यावी व एक वर्षाने याबाबत आवश्यकता भासल्यास Review घेऊन पुढील निर्णय घेण्यात यावा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कायम आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांची संवार्गानुसार संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क. | तपशील | कर्मचारी संख्या | | | कर्मचारी हिस्सा | एकूण हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कार्यरत | सेवानिवृत्त | एकूण | | |
| १ | वर्ग १ | १७८ | १२८ | ३०६ | १५०० | ४५९००० |
| २ | वर्ग २ | २०२ | २६९ | ४७१ | १५०० | ७०६५०० |
| ३ | वर्ग ३ | ३३३९ | २१०५ | ५४४४ | ११०० | ५९८८४०० |
| ४ | वर्ग ४ | ३०४० | १२३२ | ४२७२ | ७०० | २९९०४०० |
| एकूण कर्मचारी/अधिकारी यांचा मासिक हिस्सा | | | | | | १०१४४३०० |
| एकूण कर्मचारी/अधिकारी यांचा वार्षिक हिस्सा X१२ | | | | | | १२१७३१६०० |

वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचा हिस्सा प्राप्त होणार आहे व उर्वरित आवश्यक रक्कम मनपा फंडातून भरणे आवश्यक आहे.

जुन्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेप्रमाणे व न्यु इंडिया इन्शुरन्स द्वारे मागील चार वर्षामध्ये खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| वर्ष | झालेला खर्च |
|---|---|
| २०२१-२२ | २६५५८४०८९ |
| २०२२-२३ | २१४४२५२४५ |
| २०२३-२४<br>(शिक्षण मंडळ कर्मचारी समाविष्ठ करण्यात आले- दि. २८.०९.२०२३) | ३२६०२६१२३ |
| २०२४-२५ (न्यु इंडिया इन्शुरन्स) | ५०१२४८७५१ (अंदाजित) |

मा. आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५.०२.२०२५ रोजीच्या बैठकीच्या मान्य सभावृत्तान्तानुसार नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या धन्वंतरी गोल्ड योजना सुरु करणेकामी प्रस्तावित केले आहे. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तसेच धोरणातील सर्व बाबीस तसेच खालील मुद्द्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे,

- कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या हिस्स्यापोटी प्रस्तावात नमूद केलेली रक्कम सभासद वर्गणी म्हणून घेणेकामी मान्यता घेणे.
- वैद्यकीय विभागाकडील समितीने खाजगी रुग्णालयाकरिता तयार केलेल्या दरपत्रकास (PackageRate) मान्यता घेणे (सोबत दरपत्रक सादर केलेले आहे).
- धन्वंतरी गोल्ड योजनेचा तयार करण्यात आलेला प्रारूप मसुदा (धोरणास) मान्यता

| | |
|---|---|
| | घेणे.<br>• खाजगी रूग्णालया सोबत करावयाच्या करारनाम्यास मान्यता घेणे.<br>• पिंपरी चिंचवड, पुणे शहर व इतर भागातील वर्गवारीनुसार ५० रुग्णालये व सिंगल स्पेशालिटी चे १० रुग्णालये तसेच भविष्यात आवश्यकता भासल्यास धन्वंतरी गोल्ड समितीच्या मान्यतेने आणखी रूग्णालयाबरोबर करारनामे करण्यास मान्यता घेणे.<br>• धन्वंतरी गोल्ड योजना नव्याने सुरु करण्यात येत असल्याने धोरणात्मक बाब म्हणून मान्यता घेणे.<br>• धन्वंतरी गोल्ड योजने करिता अंदाजे प्रत्येक वर्षी रक्कम रुपये पन्नास कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. यास किंवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता घेणे.<br>वरील सर्व बाबींस सक्षम समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच धन्वंतरी गोल्ड योजना नव्याने कार्यान्वित करण्यात येत असल्याने सदर बाब धोरणात्मक असल्यामुळे मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८६०** **विषय क्रमांक - ८६०**

**दिनांक -** ०५/०३/२०२५ **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८६०<br>दिनांक -<br>०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. औप्रसं/०३/कावि/२०२/२०२५ दिनांक: - ०५/०३/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयटीआय मधुन तांत्रिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआय मधील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यावेतन लागू करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८६०<br>दिनांक -<br>०५/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. औप्रसं/०३/कावि/२०२/२०२५ दिनांक: - ०५/०३/२०२५ अन्वये, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१२/प्र.क्र.७९/व्यशि-३ दि.१३ सप्टेंबर, २०२३ अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दर महा र.रु. ५००/- इतक्या सुधारीत दराने विद्यावेतन देण्यास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच विद्यावेतन देणेबाबत मार्गदर्शन प्रणाली नमूद करण्यात आलेली आहे.<br>शासन निर्णयाचे अनुषंगाने पिं.चिं. मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण विभागाने शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांनाही ५००/- रुपये इतके विद्यावेतन दरमहा शासनाने द्यावे म्हणून दि.२०/१०/२०२३ रोजीच्या मा. आयुक्त सो यांचे स्वाक्षरीने शासनास पत्रव्यवहार करण्यात आला.<br>त्यानुसार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी पत्र क्र.आटीसी-२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३ दि.०८ नोव्हेंबर २०२३ च्या पत्रान्वये "सदर विद्यावेतन हे केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यानाच सदरची योजना लागू आहे. सदर |

| | |
|---|---|
| | योजनेप्रमाणे विद्यावेतन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्था अथवा इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांनाही द्यावयाचे असल्यास महापालिकेने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा याकरीता राज्य शासनाकडून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व्यतिरिक्त इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना निधी उपलब्ध होणार नाही. तरी याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावर करावी असे कळविले आहे." त्यानुसार शासनाच्या धर्तीवर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (म) कासारवाडी येथील साधारणत: दरवर्षी ९०० प्रशिक्षणार्थ्यांचे ५००/- रुपये प्रमाणे र.रु.४,५०,०००/- प्रति महिना तसेच वार्षिक साधारण र.रु.५४,००,०००/- (अक्षरी र.रु.चौपन्न लाख) इतका खर्च महापालिका स्तरावर येणार आहे. तसेच यापुढील कालावधीत ट्रेड्स वाढल्यास त्याप्रमाणे प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांनाही विद्यावेतन देय राहील. औद्योगिक प्रशिक्षण विभागाकडील दि.२६/०८/२०२४ च्या प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधुन प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**